# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील माध्यमिक शाळांशी संबंधित सर्वसमावेशक कायदा करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**(१) ८१३९ (०९-०४-२०१५). श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री. राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळांशी संबंधित शिक्षकांची पात्रता, शाळांची मान्यता, प्रशासक नियुक्त, शाळांचे मुल्यांकन आदीविषयी असलेले वेगवेगळे कायदे मोडीत काढून सर्वसमावेशक कायदा करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्याच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) व (२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ या अधिनियमाच्या अंमलबजावणीमुळे कालबाह्य झालेले कायदे अधिक्रमीत झाले आहेत. सुधारणा करणे आवश्यक असलेल्या अधिनियमात बदल करण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण (जि.रायगड) तालुक्यातील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय अपुरे पडत असल्याबाबत**

**(२) ८१५५ (०७-०४-२०१५). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. राज पुरोहित (कुलाबा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील वाढती लोकसंख्या आणि वाढत्या अपघाती घटनांमुळे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय अपुरे पडत चालले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी शासनाने १७ जानेवारी २०१३ रोजी १०० खाटांच्या मल्टी स्पेशालिस्ट रुग्णालयाला प्रस्तावाला मंजूरही दिली असून तशा प्रकारचा जीआर शासनाने प्रसिध्दही केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जागे अभावी उक्त मल्टी स्पेशालिस्ट रूग्णालय उभारण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी रूग्णालय होण्यासाठी शासन कोणती आवश्यक ती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१५-०६-२०१५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे. सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत व लोकप्रतिनिधींच्या मागण्या विचारात घेऊन दिनांक १७ जानेवारी, २०१३ च्या शासननिर्णयान्वये उरण येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय श्रेणीवर्धन करण्यास मान्यता दिली आहे.

(३) व (४) हे खरे नाही. उपजिल्हा रुग्णालयाच्या नियोजित जागेकरीता सिडकोला अदा करावयाच्या रक्कमेकरीता अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेकरीता सादर करण्याची योग्यती कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथील इको झोनमधून संरक्षित वन असलेल्या नेरळ लव्हाळवाडीतील जंगलात विना परवाना झाडे तोडण्यात आल्याबाबत**

**(३) ८१५७ (०७-०४-२०१५). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. राज पुरोहित (कुलाबा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (ता.कर्जत, जि.रायगड) येथील इको झोनमधून संरक्षित वन असलेल्या नेरळ लव्हाळवाडीतील जंगलात विना परवाना झाडे तोडण्यात आली असून त्यात मोठया संख्येने मौल्यवान जातीची झाडे तोडली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संरक्षित वनाच्या देखभालिची जबाबदारी असणा-या वनरक्षक यांनी याबाबत गुन्ह्याची नोंद संबंधित पोलिस स्टेशनमध्ये केली आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोषापिंतावर कोणत्या स्वरुपाचे गुन्हे दाखल करुन शासनाने कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०६-२०१५) :** (१) माथेरान येथील (इको सेन्सिटीव्ह झोन) पर्यावरण संवदेनशील क्षेत्रांतर्गत लव्हाळवाडीतील संरक्षित वनामध्ये मोठ्या संख्येने झाडे तोडण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, लव्हाळावाडीमधील खाजगी मा.स.नं. १२८/३ मध्ये आदिवासी खातेदार श्री.अनंता हिंदोळा यांनी १७ खैर वृक्षांची विनापरवाना तोड केल्याचे दिनांक २१.१२.२०१४ रोजी निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) सदरची झालेली वृक्षतोड ही संरक्षित तसेच शासकीय वनातील नसल्याने संबंधितांविरुध्द गुन्ह्याची नोंद करण्यात आली नाही. तथापि, श्री.अनंत हिंदोळा यांनी विनापरवाना १७ खैर वृक्षांची तोड केल्याने वृक्ष अधिकारी, माथेरान यांनी सदरचा माल जप्त करून रु.२,५५०/- इतका दंड वसूल केला आहे.

---

**राज्यातील उच्च शिक्षण प्रणाली संदर्भात केळकर समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात**

**(४) ८१६५ (०८-०४-२०१५). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री. राज पुरोहित (कुलाबा), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री. शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री. नसीम खान (चांदिवली), श्री. अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. डी.एस.अहिरे (साक्री), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च शिक्षण प्रणाली चिंताजनक असल्याची बाब केळकर समितीने अहवालात नमूद केली असून या अहवालात अनेक शिफारशी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालात सुचविण्यात आलेल्या सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) नाही. केळकर समितीच्या अहवालात अनेक शिफारशी करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) नियोजन विभागाच्या दि. १७ जानेवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये, केळकर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशी व त्यानुषंगाने प्रशासकीय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन, अहवालातील शिफारशी स्वीकारण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी मा.मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांच्या अध्यक्षतेखाली उप समिती गठित करण्यात आली आहे.

---

**अकोला महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात**
**घेता सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेबाबत**

**(५) ८१९४ (०७-०४-२०१५). श्री. गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री. समीर कुणावार (हिंगणघाट), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेवरील ५० टक्के महानगरपालिकेचा हिस्सा टाकण्याची अट रद्द करून नागरिकांना दिलासा देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (अकोला) यांनी मा.अर्थमंत्र्यांकडे जानेवारी, २०१५ मध्ये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१), (२) व (३) शासनाने दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयानुसार निर्णयानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाच्या वित्तीय आकृतीबंधामध्ये सुधारणा केलेली आहे. सुधारीत वित्तीय आकृतीबंधानुसार 'ड' वर्ग महानगरपालिकांसाठी शासनाकडून ७० टक्के अनुदान अनुज्ञेय असणार असून उर्वरित ३० टक्के निधी संबंधित 'ड' वर्ग महानगरपालिकेने उभा करणे आवश्यकत आहे.

---

**अकोला येथील खुले नाट्यगृहालगतची जागा तत्कालीन नगरपालिका प्रशासनाने १९८० मध्ये भाडेतत्वावर दुकाने उभारण्यात आल्याबाबत**

**(६) ८१९५ (०७-०४-२०१५). श्री. गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील खुले नाट्यगृहालगतची जागा तत्कालीन नगरपालिका प्रशासनाने १९८० मध्ये भाडेतत्वावर दुकाने उभारण्यासाठी दिली होती व या दुकानांपासून अकोला महानगरपालिकेला उत्पन्न मिळत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाट्यगृहालगतच्या जागेवरील १२ दुकानासंदर्भात उपायुक्त, अकोला महानगरपालिका यांनी कार्यवाही केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय, त्यानुसार सदरहू कारवाई रोखण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

(३) दिवाणी न्यायालय, अकोला येथे सदर प्रकरण न्याप्रविष्ट आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरात पाणीपुरवठा केल्या जाणा-या पाण्याच्या टाकीच्या परिसरात मोठया प्रमाणात अस्वच्छता असल्याबाबत**

**(७) ८१९९ (०६-०४-२०१५). श्री. गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री. बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील उच्चभ्रू परिसरात पाणीपुरवठा केल्या जाणा-या पाण्याच्या टाकीच्या परिसरात मोठया प्रमाणात अस्वच्छता असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नेहरू पार्कसमोर महानगरपालिकेची मोठी पाण्याची टाकी असून तेथे जवळपास ५० हजार नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील ३३ पाईपलाईनमध्ये गळती असून, ६ व्हॉल्व निकामी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) होय.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजीव गांधी जीवनदायी योजनेतून गरीब कुटुंबांना मोफत शस्त्रक्रियेसारखे उपचार मिळत नसल्याबाबत**

**(८) ८२५८ (०७-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. योगेश टिळेकर (हडपसर), श्री. भिमराव तापकीर (खडकवासला), श्री. प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. संदीप नाईक (ऐरोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. प्रतापराव चिखलीकर (लोहा), श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी), श्री. चंद्रदीप नरके (करवीर), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गरीबातील गरीब रुग्णांना आरोग्याची सुविधा देण्याकरिता शासनाने केशरी व पिवळ्या रेशनकार्ड धारकांना उपचार व शस्त्रक्रिया करणेकरिता राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील २३ रुग्णालयाचा सदर योजनेचा समावेश असून सदर रुग्णालयानी आजपर्यंत १२८०० रुग्णावर उपचार केले असून या उपचाराकरिता जिल्ह्याला ३३ कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यापैकी २२ कोटी रुपयांची रुग्णालयाची बिले शासनाकडून देण्यात आली असून अद्याप काही रुग्णालयांची जवळ जवळ १० कोटी रुपयाची बिले प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयाकडून राजीव गांधी योजनेकडील उपचार केलेल्या बिलांची प्रलंबित बाकी तात्काळ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली किंवा करण्यात येणार आहे?

**डॉ. दीपक सावंत (११-०६-२०१५) :** (१) होय, राज्यातील पिवळ्या अंत्योदय अन्न योजना, अन्नपूर्णा व केशरी शिधापत्रिकाधारक (रु.एक लक्ष वार्षिक उत्पन्न असलेले) कुटुंबे राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे लाभार्थी आहेत.
(२) कोल्हापूर जिल्ह्यातील आजपर्यंत १ शासकीय व २९ खाजगी अशा एकूण ३० रुग्णालयांचा समावेश योजनेमध्ये करण्यात आला आहे. आतापर्यंत योजनेंतर्गत १८०९६ एवढ्या रुग्णांवर शस्त्रक्रिया / उपचार करण्यात आले असून त्याची रक्कम रु.५१.७६ कोटी इतकी आहे.

(३) नाही, अंगीकृत रुग्णालयांनी विमा कंपनीकडे रु.४६.८६ कोटीचे दावे सादर केले असून त्यापैकी कंपनीने रु.३७.८१ कोटीचे दावे अदा केले आहेत.

(४) सदर योजनेतंर्गत दावे शासनाकडून अदा करण्यात येत नाहीत तर विमा कंपनी व रुग्णालये यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील तरतूदीनुसार विमा कंपनीकडून रुग्णालयांना दावे अदा केले जातात. त्यानुसार रुग्णालयांनी दाव्यांसोबत आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची ऑनलाईन पूर्तता केल्यानंतर १५ कार्यालयीन दिवसात दावे विमा कंपनीने अदा करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

---

## मुंबई, विक्रोळी टागोरनगर या म्हाडा वसाहतीमधील पंप हाऊस ४० वर्षापूर्वीचे असून जिर्ण झालेले असल्याने रहिवाशांना पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(९) ८३५१ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, विक्रोळी टागोरनगर या म्हाडा वसाहतीमधील पंप हाऊस ४० वर्षापूर्वीचे असून जीर्ण झालेले असल्याने रहिवाशांना पाणी पुरवठा सुरळीत होत नाही म्हणून वाढती लोकसंख्या विचारात घेवून नवीन पंप हाऊस बसविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीने केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन पंप हाऊस बसविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०८-०६-२०१५) :** (१), (२) व (३) मुंबई मंडळाच्या टागोरनगर विक्रोळी येथील वसाहतीमधील पाणीपुरवठा तसेच मलःनिस्सारण पंप ३० ते ४० वर्षापूर्वीचे आहेत. सदरहू वसाहतीमधील पाणीपुरवठा सुरळीत होण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य श्री.सुनिल राऊत यांचेबरोबर दिनांक १६.१.२०१५ रोजी बैठक झाली. सदरहू बैठकीमध्ये आमदारांनी वसाहतीमधील जुने पंप बदली करुन देण्याबाबतची मागणी केली होती. त्या अनुषंगाने म्हाडामार्फत सदरहू वसाहतीमधील पंपांची पाहणी केली असता जुने पंप टप्प्याटप्प्याने काढून त्या जागी नवीन पंप बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि, सदरहू पंप बसविण्याची कार्यवाही निधीच्या उपलब्धतेनुसार व आवश्यकतेनुसार करण्यात येत आहे.

---

**राज्यात सर्व ठिकाणी मराठी भाषेचा अंतर्भाव करण्याबाबत**

**(१०) ८३८० (०८-०४-२०१५). श्री. अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राज्यात मराठी शाळांना जास्तीत जास्त मान्यता देण्यात यावी, मराठी शाळेतील शिक्षकांना व शिक्षकेत्तर सेवकांना शाळांबाहेर कामे देण्यात येऊ नयेत व जास्तीत जास्त संख्येने मराठी शाळांना अनुदान द्यावे, राज्यात मराठी विद्यापीठ स्थापन करण्यात यावी, वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, विधी, औषध निर्माण शास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, जिल्हा न्यायालय स्तरापर्यंतचे सर्व न्यायालयीन कामकाज, बॉम्बे हायकोर्टाचे नामांतर महाराष्ट्र व गोवा उच्च न्यायालय असे करण्यात यावे तसेच सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये, महामंडळे, राज्यातील बँका व वित्त संस्था, सहकारी संस्था, टोल नाके, दुकाने, बांधकाम व्यावसायिक संस्था, इतर संस्था तसेच हॉटेल यांचा व्यवसाय मराठीत केला जावा, सरकारी खाजगी नोक-यांमध्ये मराठी भाषिकांना प्राधान्य देण्यात यावे, राज्यातील वाहनांच्या नंबर प्लेट या मराठीतच असाव्यात, भ्रमणध्वनीवर मराठीच प्राधान्य मिळावे, राज्यातील चित्रपटामध्ये मराठी कलावंत व तंत्रज्ञानाचे प्रमाण किमान ३० टक्के तरी असावेच असा मराठी भाषा धोरणात शिफारशी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिफारशींच्या अंमलबजावणीबाबतची कार्यवाही सुरू झाली आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती विभागातून प्रत्यक्षात सुरूवात झाली आहे वा सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) नाही.

मात्र मा.नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखालील भाषा सल्लागार समितीने तयार केलेल्या महाराष्ट्र राज्याचे पुढील २५ वर्षासाठीचे मराठी भाषाविषयक धोरण-२०१४ च्या मसुद्यामध्ये या प्रश्नामध्ये उपस्थित केलेल्या शिफारशींचा अंतर्भाव आहे. तथापि, धोरणाचा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही समितीच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातसा धरणाचा (ता.शहापूर, जि.ठाणे) उजवा कालवा**
**अनेक ठिकाणी नादुरुस्त झाला असल्याबाबत**

**(११) ८४४३ (०७-०४-२०१५). श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात भातसा धरणाचा उजवा कालवा अनेक ठिकाणी नादुरुस्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालवा नादुरुस्त झाल्याने शेवटच्या टोकापर्यंत पाणीपुरवठा होत नसल्यामुळे शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) या कालव्याची दुरुस्ती करण्याबाबतची मागणी तेथील लोकप्रतिनिधीनी शासनाकडे वेळोवेळी करुन सुध्दा अद्यापही कालव्याची दुरुस्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कालव्याची त्वरीत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.

वनजमीन हस्तांतरणा अभावी कालवा वितरण व्यवस्थेसह कामे पूर्ण करता आली नसल्याने पाणी शेवटच्या टोकापर्यंत देता येत नाही.
(३) उपलब्ध निधीनुसार यांत्रिकी विभागाच्या सहाय्याने वेळोवेळी दुरुस्ती केली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तारापूर (जि.पालघर) येथील अणुऊर्जा प्रकल्पामधील शटडाऊनच्या कामांदरम्यान परराज्यातील कंत्राटी कामगार अतिसंवदेनीत व किरणोत्सर्गाच्या भागामध्ये काम करीत असल्याबाबत**

**(१२) ८४६० (०७-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री. सरदार तारासिंह (मुलुंड), श्री. राज पुरोहित (कुलाबा), श्री. अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) येथील अणुऊर्जा प्रकल्पामधील शटडाऊनच्या कामांदरम्यान परराज्यातील कंत्राटी कामगार अतिसंवदेनीत व किरणोत्सर्गाच्या भागामध्ये काम करीत असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परराज्यातील कंत्राटी कामगारांना एक दिवसाचे जुजबी प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांच्याकडे महत्वाची कामे सोपवली जात असल्याने सुरक्षिततेची व किरणोत्सर्गाच्या प्रसाराचा धोका निर्माण झाला असूनही मात्र व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शटडाऊनसाठी अनेक स्थानिक प्रशिक्षीत बेरोजगार प्रयत्नशील असताना परराज्यातील कंत्राटी कामगारांना सदर कैंद्रात आणण्याची कारणे काय आहेत,
(४) सदर अणुऊर्जा कैंद्र हे कंत्राटी कामगारांच्या विळख्यात सापडल्याने अशा अल्पप्रशिक्षित परराज्यातील कंत्राटी कामगारांच्या हलगर्जीपणामुळे किरणोत्सर्गाचा प्रसार होऊ नये याकरिता शासनाची कोणती भूमिका आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय ?

**श्री. प्रकाश मेहता (११-०६-२०१५) :** (१) तारापूर (जि.पालघर) येथील अणूऊर्जा प्रकल्पासह देशातील सर्व अणूऊर्जा प्रकल्प हे केंद्र शासनाच्या अणु ऊर्जा विभागाच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे सदरहू प्रकरणी समुचित शासन हे केंद्र शासन आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंप्री धनगर, (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील मन प्रकल्पातून उपसा सिंचनासाठी ३ डी.पी. सह विद्युत लाईन टाकण्याचे काम तात्काळ सुरू करणेबाबत**

**(१३) ८४८३ (०४-०४-२०१५). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंप्री धनगर (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील मन प्रकल्पातून उपसा सिंचनासाठी ३ डी.पी.सह विद्युत लाईन टाकण्याचे काम तात्काळ सुरू करणेबाबत मागील १ वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत मा. आकाश फुंडकर, वि.स.स. यांनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्राद्वारे मुख्य अभियंता यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील ठिकाणी देऊळगाव साकर्शाहून मन धरणापर्यंत विद्युत लाईन टाकण्याचे कामाच्या अंदाजपत्रकाला मार्च, २०१४ मध्ये एस.पी.ए. योजनेअंतर्गत मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यानुसार आम्ही २५ शेतक-यांनी विद्युत कनेक्शन चार्जेस रू.७,५००/- प्रमाणे म.रा.वि.वि.कं. खामगाव यांचेकडे दिनांक २५ मार्च, २०१४ रोजी भरणा केला, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सगळी प्रक्रिया पूर्ण होऊनसुध्दा या गावातील नागरिकांना व त्यांच्या शेतीला व सिंचनासारख्या मूलभूत गरजेपासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर प्रलंबित असलेले ३ डी.पी.सह व सहविद्युत लाईन टाकण्याचे काम तात्काळ सुरू करणेबाबत संबंधितांना आदेश देण्यात आले, आहेत काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) आवश्यक रक्कमेचा भरणा करुन प्रलंबीत असलेल्या कृषीपंप अर्जदारांच्या वीज जोडणीच्या कामांकरिता निविदा काढण्यात आल्या असुन कार्यादेश देण्यात येवून सदर कामे लवकरच पुर्ण करण्यात येतील.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगांव, (जि.बुलडाणा) येथील राज्य शासनाच्या अल्पसंख्याक (सन २०१४-१५) ग्रामीण क्षेत्रात मुलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ८५०४ (०७-०४-२०१५). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथील राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक सन २०१४-१५ ग्रामीण क्षेत्रात मुलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत पंचायत समिती, खामगांव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा यांना प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अल्पसंख्यांक ग्रामीण भागात पायाभूत सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रस्तावास त्वरीत मान्यता देण्याकरीता लोकप्रतिनिधी यांनी मा.मत्री अल्पसंख्यांक विकास यांना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये पत्राव्दारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाला तात्काळ मंजुरी देण्याबाबत संबंधितांना आदेश देणार आहात काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०६-२०१५) :** (१) होय.

(२) नाही.

(३) सन २०१४-१५ या वर्षात बुलडाणा जिल्हयातील तालुक्याचे प्रस्ताव खामगांव तालुक्यातील प्रस्तावासह शासनास ग्रामिण क्षेत्रात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्याकडून दि.०६.०१.२०१५ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाले होते. शासन निर्णय दि.२१/०६/२०१४ च्या तरतुदीनुसार दि.०१/०९/२०१४ पर्यंत प्रस्ताव प्राप्त होणे आवश्यक होते. तथापि, त्यानंतर प्रस्ताव प्राप्त झाल्याने सन २०१४-१५ या वर्षात सदर प्रस्तावाला मान्यता प्राप्त होऊ शकली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे दिवठाणा ( ता.खामगांव, जि.बुलडाणा) येथील जमिन बाजारभावाप्रमाणे खरेदी करण्याबाबत

**(१५) ८५०६ (०७-०४-२०१५). श्री. आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव तालुक्यातील (जि.बुलडाणा) निमकवळा शिवारात ज्ञानगंगा नदीवर निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्प नावाचे छोटे धरण बांधण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणासाठी निमकवळ, काळेगांव, दिवठाणा व वर्णा येथील शेतक-यांची जमिनी संपादित करण्यात आली असून आतापर्यंत प्रकल्पासाठी बाधित क्षेत्रापैकी १२७ हेक्टर जमिन पाटबंधारे विभागाने सरळ खरेदी करून संपादित केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पामध्ये बाधित होणा-या ४ गावांपैकी ३ गावाची शेतजमिन बाजारभावाप्रमाणे (सुमारे १० लाख रुपये किंमतीने) सरळ खरेदी व्यवहाराने संपादित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, दिवठाणा येथील शेतक-यांच्या शेतजमिनीचे भू-संपादन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत शासनाने मंजुरी दिलेला असतांनाही अद्यापपर्यंत या गांवातील शेतजमिन संपादित केलेली नाही, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, या गावांतील शेतजमिनीचे संपादन जुन्या भू-संपादन कायद्याप्रमाणे संपादित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी शासनाकडे सादर केल्यामुळे या गावांतील भू-संपादनाची प्रक्रिया बंद असल्यामुळे प्रकल्पाचे कामही बंद आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, मौजे दिवठाणा या गावांतील शेतजमिन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत तसेच शेतक-यांना मोबदला देण्याबाबत शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०६-२०१५) :** (१) होय.
(२) मो.काळेगांव, निमकवळा व रोहणा येथील एकूण १२७.७६ हे जमीन सरळ खरेदीने संपादित केलेली आहे.
(३) होय. जमीनीच्या सरळ खरेदीचा सरासरी दर रु.९.६२ लक्ष प्रति हे. एवढा आहे.
(४) व (५) दिवठाणा येथील शेतकऱ्यांनी शेतजमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला देवून करण्याबाबत अर्ज दिल्यामुळे सरळ खरेदीने जमिन संपादित केलेली नाही. भूसंपादन प्रक्रिया निवाड्यावर आहे. दिवठाणा गावाची जमिन बुडीत क्षेत्राच्या शेवटच्या भागात येते. प्रकल्पाचे काम प्रगतीत आहे.
(६) दिवठाणा येथील भूसंपादन प्रकरणी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेमार्फत अंतीम निवाडा झाल्यावर संबंधीत शेतकऱ्यांना मोबदला अदा करण्यात येईल.

---

## मुंबईतील जुहू येथील गृहस्वप्न सोसायटीला म्हाडा अधिकाऱ्यांनी जादा चटईक्षेत्र देऊन केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१६) ८५७० (०७-०४-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जुहू येथील गृहस्वप्न सोसायटीला म्हाडा अधिकाऱ्यांनी जादा चटईक्षेत्र देऊन केलेल्या गैरव्यवहाराबाबत श्री.बी.के.अग्रवाल यांनी केलेल्या चौकशी अहवालातील शिफारसींच्या अनुषंगाने कार्यवाही चालू आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, जादा चटई क्षेत्रफळ देण्यामागे तत्कालीन सनदी अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या गुप्त चौकशीस गृह विभागाने परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिफारसीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०८-०६-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे, जुहू गृहस्वप्न ही संस्था उच्च उत्पन्न गटात मोडते, तसेच जे.व्ही.पी.डी.या वसाहतीस विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अन्वये चटई क्षेत्र निर्देशांक १.२ इतका मर्यादित होत नाही. तसेच विषयांकित संस्थेस जादा चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केलेला नाही. महानगरपालिकेने मंजूर केलेल्या जे.व्ही.पी.डी. वसाहतीच्या अभिन्यासानुसार जे चटई क्षेत्र उपलब्ध झाले, ते वितरण करण्याबाबत सर्वप्रथम वर्तमानपत्रातून जाहिरात देण्यात आली. त्यास अनुसरुन जे अर्ज प्राप्त झाले. त्यांना त्यांच्या मागणीनुसार उर्वरित चटइक्षेत्र वितरीत करण्यात आले. संस्थेस नगरविकास विभागाच्या मंजूरीनुसार २.४ निर्देशांकापर्यंत चटईक्षेत्र वितरीत करण्यात आले.

सदर संस्थेस म्हाडाच्या मान्य दरानुसार चटईक्षेत्राची विक्री करण्यात आली आहे व त्यास कोणतीही सवलत देण्यात आलेली नाही. तसेच संस्थेतर्फे जादा उपलब्ध होणारे गाळे विकण्याबाबत प्रतिबंध नसल्याने अशी विक्री बेकायदेशीरपणे झालेली आहे असे म्हणता येत नाही. अशा प्रकारे उपलब्ध झालेले गाळे जे खुल्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत, त्यास म्हाडा ठराव क्रमांक ५९९८ दि.९.१.२००४ अन्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात आली आहे.

प्रस्तुत जुहू गृहस्वप्न सहकारी गृहनिर्माण संस्थेस अतिरिक्त चटईक्षेत्र वितरणासंदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने बी.के.अगरवाल यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य चौकशी समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीच्या अहवालासंदर्भात म्हाडाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायानुसार गृहनिर्माण विभागाने आपले निष्कर्ष नोंदवून सदर नस्ती शासनाच्या मान्यतेसाठी सादर केली असता दि.२१.६.२०१२ रोजी मंत्रालयात लागलेल्या आगीत भक्ष्यस्थानी पडून नष्ट झाली. प्रस्तुत विषयीचे दस्तऐवज पुनश्च एकत्रित करुन सदर प्रकरण नगरविकास विभागाकडे त्यांच्या अभिप्रायार्थ दि.२४.११.२०१४ रोजी पाठविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर भूखंडावर व्यावसायिक बांधकामाला मंजूरी असताना रहिवाशी वापरासाठी बांधकाम करण्यात आल्याबाबत

**(१७) ८५७५ (०८-०४-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर सिटी सर्वे नं.१०१ शिट २५९, २६०, २६९, २७० आणि २७१ मौजा नागपूर या भूखंडावर व्यावसायिक बांधकामाला मंजूरी असताना रहिवाशी वापरासाठी बांधकाम करण्यात येत असल्याची बाब माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रामध्ये मिश्र व्यावसायिक आणि रहिवाशी वापरास परवानगी देताना कामगार आयुक्तांकडून ना हरकत प्रमाणपत्र बांधकाम व्यावसायीकाने घेतलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब (१) व (२) नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. या जागेवर सुरुवातीपासून मिश्र वापराची परवानगी देण्यात आली आहे.
(२) कामगार आयुक्तांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने आचारसंहिता सुरु होण्याआधी शेवटच्या तीन महिन्यात सिंचनाच्या ११०० कोटींच्या कामांना दिलेल्या मंजूरीबाबत**

**(१८) ८५९१ (०७-०४-२०१५). श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन शासनाने आचारसंहिता सुरु होण्याआधी शेवटच्या तीन महिन्यात सिंचनाचा ११०० कोटींच्या कामांना दिलेली मंजूरी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाव्दारे रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूरी दिलेली कामे रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या संबंधित व्यक्तिंवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, कारवाईस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) :** (१) व (२) नाही.

शासन आदेश दि. १८/१०/२०१४ व दि.२/१२/२०१४ अन्वये दि. १८/१०/२०१४ नंतरच्या रु. १ कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी पूर्वअर्हता पध्दती ऐवजी पश्चातअर्हता पध्दती लागू करण्यात आली आहे. त्यामुळे दि. १८.१०.२०१४ पर्यंत मंजूर न केलेल्या व पश्चात अर्हता पध्दतीचा अवलंब न करता काढलेल्या निविदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**टेंमुर्डा परिसरातील (जि.चंद्रपूर) ३५ ते ४० गावातील शेतक-यांनी नापिकी व कर्जबाजारीला कंटाळून आपले पशुधन विक्रीला काढल्याबाबत**

**(१९) ८६७६ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टेंमुर्डा परिसरातील (जि.चंद्रपूर) ३५ ते ४० गावातील शेतक-यांनी नापिकी व कर्जबाजारीला कंटाळून आपले पशुधन माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास विक्रीला काढले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतक-यांना या आर्थिक संकटातून बाहेर काढण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप यासंदर्भात निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भातील गोसेखुर्द इंदिरा नगर राष्ट्रीय धरणातील पाण्याचा साठा वाढल्याने म्हसली ग्रामपंचायतील मौ.धामणी, पवनी, पिंपरी, उमरी व चिचघाट गावांना पुराचा धोका निर्माण झाल्याबाबत**

**(२०) ८७२९ (०४-०४-२०१५). श्री. सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील बहुचर्चित गोसेखुर्द अर्थात इंदिरा नगर राष्ट्रीय धरणातील पाण्याचा साठा वाढल्याने म्हसली ग्रामपंचायतील मौ.धामणी, पवनी, पिंपरी, उमरी व चिचघाट गावांना पुराचा धोका निर्माण झाल्याबाबतचे वृत्त दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणाने हल्ली २४५ मीटरपर्यंतची उंची गाठली असून २४७ मीटरपर्यंत जलसाठा वाढवण्यात आल्यामुळे गावांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील कुटूंबाचे योग्य प्रकारे पुनर्वसन होऊ न शकल्यामुळे या गावांचा पुराचा धोका निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गावातील पुराचा धोका लक्षात घेता पुनर्वसनाची प्रक्रिया त्वरित पूर्ण करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, त्याचा कालावधी काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) जांबरे पाटबंधारे मध्यम प्रकल्पाचे लाभ क्षेत्रातून नांदवडे, करंजगाव व शेवाळे ही गावे वगळण्यात आली असल्याबाबत

**(२१) ८७६९ (०८-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री. भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) जांबरे पाटबंधारे मध्यम प्रकल्पाचे लाभ क्षेत्रातून नांदवडे, करंजगाव व शेवाळे ही गावे वगळण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांचा समावेश प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात करणेबाबत मा. जलसंपदा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ३० जानेवारी, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार जांबरे मध्यम पाटबंधारे प्रकल्प लाभक्षेत्रातून वगळण्यात आलेल्या गावाचा समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :**(१) नाही.
(२) होय.
(३) प्रश्न भाग (१) - प्रश्न उद्‌भवत नाही.
प्रश्न भाग (२) - महामंडळाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पारगड किल्ल्यावर (जि.कोल्हापूर) वनविभागाचा असलेला ताबा काढून घेवून गावठाण घोषित करण्याबाबत.

**(२२) ८८४५ (०७-०४-२०१५). श्री. सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पारगड किल्ल्यावर (जि.कोल्हापूर) वनविभागाचा असलेला ताबा काढून घेवून गावठाण घोषित करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, मा. वनमंत्री यांचे दि. २९ डिसेंबर, २०१४ च्या लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने निवेदनात नमूद केलेल्या समस्या दुर करण्याच्या दृष्टीने शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू कार्यवाही किती कालावधीत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हास्तरीय समितीने वन हक्क कायद्याअंतर्गत घरासाठी मान्य केलेले हक्क सदर अधिनियमाचे कलम ३(१) (a) अंतर्गत मान्य केलेले आहे. गावठाणासाठी वन हक्क मान्य करण्याची तरतूद कलम (३) (१) (h) मध्ये आहे. त्यानुसार गावठाणाचे हक्क मान्य केल्यास वनजमिनीचे वैधानिक स्वरूप न बदलता गावठाणा करिता क्षेत्र नियमित करणे शक्य आहे. या संदर्भात कार्यवाही करण्याची सूचना जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना देण्यात आले आहेत.
(३) कोणताही विलंब झालेला नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील बाळे-हत्तुर ते हत्तुर-बोरामणी यास बायपास उड्डाणपुल करण्याबाबत**

**(२३) ८९३४ (०९-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :**
सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील बाळे ते हत्तूर आणि हत्तूर ते बोरामणी या प्रस्तावित मार्गाला निधी मिळविण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतुकमंत्री यांच्याकडे प्रस्ताव पाठविला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाळे-हत्तुर ते हत्तुर-बोरामणी यास बायपास उड्डाणपुल बांधण्याबाबत तसेच शहरातील अंतर्गत रस्त्यांच्या निर्मितीसाठी कामे तातडीने सुरू करण्यात यावी अशी तेथील जनतेने मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१५) :** (१) होय.
(२) होय.
(३) बाळे ते हत्तुर हा २१ कि.मी. लांबीचा बाहयवळण रस्ता उड्डाणपुलासह NHDP-III अंतर्गत मंजूर आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेमार्फत निविदेची कार्यवाही सुरु आहे.

हत्तुर ते बोरामणी ह्या २५.३४ कि.मी. लांबीच्या बाह्यवळण रस्ताचे उड्डाणपुलासह प्राथमिक सर्वेक्षण NHAI कडून सन २०११-१२ मध्ये करण्यात आलेले असून प्रस्ताव केंद्रशासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) येथील पद्मदुर्ग किल्ल्याची झालेली दुरवस्था

**(२४) ८९५६ (०७-०४-२०१५). श्री. जयंत पाटील (इस्लामपूर), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील पद्मदुर्ग किल्ल्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर किल्ल्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर किल्ल्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) पद्मदुर्ग किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून तो भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय मुंबई यांच्या अखत्यारीत येतो. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार पद्मदुर्ग किल्ल्यातील तटबंदी व वास्तु अवशेष थोड्या प्रमाणात ढासळलेली असून तेथे झाडे-झुडपे उगवलेली आहे.
(२) व (३) सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मध्ये पद्मदुग्र किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीची अनुक्रमे रु.२२,५६,८२१/- व रु.३,००,०००/- इतक्या रकमेची कामे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मार्फत करण्यात आली आहेत. सदर किल्ल्याच्या जतन व दुरुस्तीचे काम सन २०१५-१६ मध्ये घेण्याचे प्रस्तावित असून हे काम निधीच्या उपलब्धततेनुसार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सेवायोजन कार्यालयात नाव नोंदवूनही नोकरीची संधी सन १९८५ पासून मिळत नसल्याने पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे तीन वर्षे बेरोजगारांना प्रति महिना रुपये १५०० देण्याची मागणीबाबत

**(२५) ९००१ (०७-०४-२०१५). श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सेवायोजन कार्यालयात नाव नोंदवूनही नोकरीची संधी सन १९८५ पासून मिळत नसल्याने पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे तीन वर्षे बेरोजगारांना प्रति महिना रुपये १५०० देण्याची मागणी राज्यातील विविध स्तरातून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याबाबत रोजगार मेळावे, रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम, ग्रंथालय योजना इ. उपक्रम राबिवले जात आहेत. तसेच रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास अभियान राबविण्यासाठी राज्यात कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची स्थापना करण्यात आली आहे. यास्तव उपरोक्त मागणी शासनस्तरावर विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळग्रस्त गावांना मदत करणेबाबत**

**(२६) ९०१० (०८-०४-२०१५). श्री. संजय कदम (दापोली), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. भास्कर जाधव (गुहागर), श्री. रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खरीप हंगामातील पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या १९ हजार ५९ दुष्काळग्रस्त गावाच्या संख्येत आणखी ४ हजार ७५२ गावांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वच दुष्काळग्रस्त गावांना मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०९-०६-२०१५)** :(१) होय.
(२) सन २०१४ मधील खरीप व रब्बी हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या अनुक्रमे २३,८११ व १,२५३ गावांमध्ये टंचाईसदृष्य परिस्थती जाहीर करण्यात आली असून तेथे विविध सोयी/सवलती लागू करण्यात आल्या आहेत. तसेच खरीप हंगामातील बाधित शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी रु.४.०००/- कोटी निधी वितरित केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंडवाना गडचिरोली विद्यापिठाचे उपकेंद्र चिमूर येथे सुरू करण्याबाबत**

**(२७) ९१७४ (०८-०४-२०१५). श्री. अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना गडचिरोली विद्यापीठाचे उपकेंद्र चिमूर येथे सुरू करण्याबाबत सदर प्रकरणी आवश्यक तो सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून दि. १६ एप्रिल, २०१५ अन्वये शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यातील ऐतिहासिक गड व किल्ल्यांचे संवर्धन करण्याकरिता महामंडळ स्थापन करण्याच्या मागणीबाबत**

**(२८) ९२०२ (०७-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री. जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री. सदा सरवणकर (माहिम), श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शिवकालीन किल्लेगड असून या किल्ल्यांची अतिशय दुरवस्था होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये शासनाकडे नोंद असलेल्या गड किल्ल्यांची संख्या किती आहे व त्यांची नावे काय आहेत,

(३) असल्यास, अशा ऐतिहासिक ठेवांचा वारसा जपण्यासाठी सदर किल्ल्यांची दुरूस्ती होण्यासाठी विशेष निधी शासनाने द्यावा अशी मागणी नाशिक (प) विभागाच्या लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०१५ मध्ये वा दरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यातील गडकोटांच्या डागडुजी आणि संवर्धनासाठी किल्ले संवर्धन महामंडळ स्थापन करण्याचे सह्याद्री गिरीभ्रमण या संस्थेकडून मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर गडकिल्ल्यांच्या संरक्षणाची व संवर्धनाची नेमकी कोणत्या यंत्रणेवर निश्चित केलेली आहे, गड किल्ले संरक्षण व संवर्धनासाठी महामंडळाची स्थापना करुन त्यांचा विकास करण्याचा कालबध्द कार्यक्रम आखण्यात येणार आहे काय,

(६) असल्यास, राज्यातील किल्ल्यांची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

(२) राज्यात सुमारे ३१७ किल्ले असून त्यापैकी ४७ किल्ले राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्या अखत्यारीत येतात तर ४९ किल्ले राज्य संरक्षित स्मारक असून ते राज्य पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येतात.

(३) होय.

(४) होय.

(५) राज्यातील गड किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याकरीता मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक ३०.०३.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षेतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(६) गड किल्ले संवर्धन समितीच्या शिफारशीनुसार जतन व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येतील.

(७) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**सोलापूर सारख्या शहरातून गत वर्षात ५० पेक्षा जास्त पुरुष, महिला व लहान मुले बेप्त्ता झाल्याबाबत**

**(२९) ९२३९ (०७-०४-२०१५). श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातून गत वर्षात ५० पेक्षा जास्त पुरुष, तसेच महिला व लहान मुले बेपत्ता झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ अखेर निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे, २०१४ मध्ये सर्वाधिक ६० व्यक्ति बेपत्ता झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा अचानक बेपत्ता होणा-या लोकांचा तपास करण्याकरिता स्वतंत्र मनुष्य बळ व तरतूद नसल्याने अनेक लोक आजवर बेपत्ता आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०१५) :** (१) होय.

(२) माहे मे, २०१४ मध्ये ६० व्यक्ती बेपत्ता झाल्याची नोंद असून त्यापैकी ४४ व्यक्ती मिळून आलेल्या आहेत.

(३) व (४) पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर कार्यक्षेत्रातील ५४८ बेपत्ता प्रकरणांचा संबंधित तपासिक अधिकारी, तपासिक अंमलदार यांनी तपास पूर्ण करुन बेपत्ता व्यक्तिंचा शोध घेवून ४४८ बेपत्ता व्यक्ति मिळून आले आहेत व उर्वरित १०० बेपत्ता व्यक्तिचा शोध चालू आहे.

उक्त प्रकरणी अचानक बेपत्ता झालेल्या लोकांचा तपास करण्याकरीता त्यांचे नोतवाईकांकडे व शेजारी आजू बाजूस राहणा-या लोकांकडे विचारपूस करुन तपास करण्यात येतो. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी बेपत्ता असणा-या लोकांकडे असणारे मोबाईल ट्रेसिंग करुन शोध घेण्यात येतो. तसेच १८ वर्षाखालील हरविलेल्या बालकांच्या बाबतीत शासन परिपत्रक क्र.सी. आरटी ९१२/प्र.क्र.५४/पोल-१३ दिनांक १०/११/२०१४ प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करुन त्याप्रमाणे तपास करण्यात येतो.
(५) विलंब झालेला नाही.

---

**खेड तालुक्यात राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु यांचे स्मारक करण्याबाबत**

**(३०) ९२५५ (०७-०४-२०१५). श्री. सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यात राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु यांचे स्मारक करण्यासाठी शासनाने सुरु केलेले काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत व यासाठी आतापर्यंत किती निधी खर्च झाला आहे व अजून किती निधीची आवश्यकता आहे,
(३) अद्याप स्मारक उभारणीचे काम सुरु झाले नसल्यास, त्यांची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) होय.
(२) थोरला वाड व संरक्षित भिंतीचे जतन/दुरुस्तीचे काम ठेकेदाराने नकार दिल्यामुळे व स्थानिक जनतेच्या विरोधामुळे पूर्ण करता येऊ शकले नाही. जन्मघर या वास्तुची जतन दुरुस्तीकरीता रु.६,७९,७०/- इतका खर्च करण्यात आलेला आहे रु.१,४८,१४,०००/- इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(३) सदर स्मारकाच्या जतन दुरुस्तीच्या कामाकरीता दि.२६.२.२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर स्मारकाचे काम दि.२४.३.२०१४ पासून प्रगती पथावर आहे.

---

**कोल्हापूर शहरातील शिवाजी विद्यापीठामध्ये वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र आणि एमए मास कम्युनिकेशन या विभागांच्या एकत्रिकरणाच्या कामाबाबत**

**(३१) ९३१२ (०८-०४-२०१५). डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील शिवाजी विद्यापीठामध्ये वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र आणि एमए मास कम्युनिकेशन विभागांचे एकत्रिकरण करुन त्यासाठी जागा व निधीची तरतूद करुन एक वर्षाचा कालावधी लोटूनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त इमारतीचे बांधकाम त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, साधारणत: केंव्हापर्यंत उक्त इमारतीचे बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०६-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) नियोजीत इमारतीच्या जागेबाबत अधिविभागाकडून बदल सुचवण्यात आल्यामुळे पर्यायी जागा निश्चित करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.
(३) नियोजीत इमारतीच्या बांधकामासाठी वास्तुविशारद यांच्याकडून प्रारुप आराखडा तयार करण्यात आला असून जागा निश्चित झाल्यानंतर तातडीने बांधकाम सुरु करण्यात येईल.

---

**राज्यात ज्या भागात वीज भारनियमन आहे त्या भागातील दहावी, बारावीच्या परिक्षा केंद्रावर जनरेटर अथवा इन्व्हर्टरची व्यवस्था करण्याबाबत**

**(३२) ९३२३ (०९-०४-२०१५) डॉ. सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री. राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ज्या भागात वीज भारनियमन आहे त्या भागातील दहावी, बारावीच्या परिक्षा केंद्रावर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जनरेटर अथवा इन्व्हर्टरची व्यवस्था करण्याच्या सूचना माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास मुंबई उच्च न्यायालयाने दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील किती परिक्षा केंद्रावर अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत,
(३) तसेच राज्यातील अशा सर्व परिक्षा केंद्रावर जनरेटरच्या अथवा इन्व्हर्टरची सुविधा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) कोल्हापूर जिल्ह्यात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेकरिता १३३ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेकरिता ५३ परीक्षा केंद्रावर जनरेटर अथवा इन्व्हर्टरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.
(३) फेब्रुवारी/मार्च २०१५ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेकरिता भारनियमनग्रस्त २३१ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेकरिता भारनियमनग्रस्त १२५ परीक्षा केंद्रावर जनरेटर/इन्व्हर्टरची सुविधा परीक्षेपूर्वी उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावंतवाडीतील (जि.सिंधुदुर्ग) निवती ते आरोंदा किनारपट्टीवरील शासनाने पोलीस गस्तीनौका बंदावस्थेत असल्याबाबत**

**(३३) ९३५८ (०७-०४-२०१५). श्री. वैभव नाईक (कुडाळ), श्री. भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडीतील (जि.सिंधुदुर्ग) निवती ते आरोंदा किनारपट्टीवर शासनाने पोलीस गस्तीनौका इंधनाअभावी बंदावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गस्तीनौका बंद अवस्थेत असल्यामुळे सागरी सुरक्षिततेच्या दृष्टीने धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गस्तीनौकांना इंधन पुरविण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) गस्ती नौकांना नियमितपणे इंधन पुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुर्वाश्रमीचा एन्रॉन दाभोळ वीज प्रकल्प, रत्नागिरी गॅस व वीज प्रकल्पात कामगार भरतीबाबत**

**(३४) ९३६९ (०६-०४-२०१५). श्री. राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्वाश्रमीचा एन्रॉन दाभोळ वीज प्रकल्प, रत्नागिरी गॅस व वीज प्रकल्पात कामगार भरती करतांना न्यायालयीन मार्गदर्शकांच्या सुचनांना व निर्णयांना तिलांजली देऊन अधिकारी व कंत्राटदार मनमानीपणे भरती करित असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयीन निर्णयांची अंमलबजावणी न करता कारभारांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साळवा (ता. धरणगांव, जि. जळगांव) ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत बांधलेले शौचालयांची बांधकामे निकृष्ट असल्याबाबत**

**(३५) ९४०७ (०७-०४-२०१५). श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साळवा (ता. धरणगांव, जि. जळगांव) येथील ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या महिलांच्या सार्वजनिक शौचालयाची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शौचालयांची बांधकामे अतिशय नादुरुस्त झाल्याने सन २००६ मध्ये वा त्या दरम्यान आदर्श गावाच्या नावाखाली नविन शौचालय बांधण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट बांधकामाची चौकशी केली काय व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही, साळवा (ता.धरणगांव, जि.जळगांव) येथील सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम ग्रामस्वच्छता अभियांनांतर्गत नसून सन २००३-०४ मध्ये आदर्श गाव योजनेंतर्गत सदर बांधकाम करण्यात आलेले आहे, तसेच संपूर्ण स्वच्छता अभियांनांतर्गत सन २००९-२०१० मध्ये १ व सन २०१०-११ मध्ये २ असे एकूण ३ सार्वजनिक शौचालय (महिला) युनीट बांधण्यात आलेले असून ते सद्यस्थितीत वापरात असून सुस्थितीत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देऊळगाव राजा (जि.बुलडाणा) येथील ऐतहािसकि मोती समाधिस्थळ व दगडी कारंजे यांचे जतन करण्याबाबत**

**(३६) ९४२८ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) येथील ऐतहािसकि मोती समाधिस्थळ पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे नष्ट होण्याच्या स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने, उपरोक्त मोती समाधिस्थळ व दगडी कारंजे यांचे जतन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) व (२) सदर वास्तु या राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय नागपूर यांच्या अखत्यारीत येतात. अधिक्षक पुरातत्वविद् नागपूर यांनी कळविल्यानुसार सदर वास्तु चांगल्या स्थितीत आहेत. सदर स्मारकांच्या जतन व दुरुस्तीकरीता मागील वर्षात एकूण रु.२४,८९३/- इतका खच केला असून चालू आर्थिक वर्षात देखील कामे प्रस्तावित आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा शहरातील नाटयगृहाचे बांधकाम पूर्ण करणेबाबत**

**(३७) ९४२९ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा शहरातील गेल्या अनेक वर्षापासुन नाटयगृहाचे बांधकाम रखडलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त नाटयगृहाचे कामास होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय,
(३) बुलढाणा शहरातील नाटयगृहाचे बांधकाम त्वरीत पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) होय.
(२) शहरात उद्‌भवलेली तीव्र पाणी टंचाई, कंत्राटदारांच्या वैयक्तिक अडचणींमुळे झालेला विलंब, बांधकाम साहित्य घटक व मजुरीमध्ये झालेली दरवाढ इत्यादींमुळे नाट्यगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यास विलंब झाला असल्याचे मुख्याधिकारी यांनी नमूद केले आहे.
(३) व (४) सदर काम त्वरीत पूर्ण करणेबाबत नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र.२४ दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ पारित केला असून हे काम ४ महिन्यांत पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

---

**अंधश्रध्दा विरोधी (जादूटोणा विरोधी) कायद्याचा शालेय अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्याबाबत वारकरी संप्रदायाचा असलेला विरोध**

**(३८) ९४९२ (०९-०४-२०१५). श्री. प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण महामंडळाने अंधश्रध्दा विरोधी (जादूटोणा विरोधी) कायद्याचा शालेय अभ्यासक्रमात अंतर्भाव करण्याचा दिनांक ४ डिसेंबर, २०१४ रोजी काढलेल्या परिपत्रकाच्या विरोधात वारकरी संप्रदाय, हिंदुत्ववादी संघटना व पालक वर्गाने तीव्र विरोध दर्शविला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण महामंडळाने काढलेले परिपत्रक मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०६-२०१५) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मनसर (जि.नागपूर) येथे उत्खननामध्ये सापडलेल्या अवशेषांचे जतन करण्याबाबत

**(३९) ९५१३ (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनसर (जि.नागपूर) येथे केंद्रीय पुरातत्व विभागाने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास केलेल्या उत्खननामध्ये जे अवशेष सापडले आहेत त्यांचे जतन करण्याकरिता शासनामार्फत कोणती व्यवस्था करण्यात आली आहे,
(२) असल्यास, सदरचे अवशेष कोणत्या संग्रहालयात ठेवण्यात आले आहेत, तसेच त्यांचे जतन करण्याकरिता कोणती विशेष दक्षता घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०६-२०१५) :** (१) व (२) मनसर जि. नागपूर हे स्थळ राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण महासंचालनालयाच्या अखत्यारीत येते. सदर स्थळचे उत्खनन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांनी केले असून उत्खननात प्राप्त वस्तु मनसर येथील बोधीसत्व नागार्जुन अनुसंधान संस्था येथे ठेवण्यात आल्या आहेत. सदर वस्तु संग्रहालयात ठेवण्याबाबत जनहीत याचिका क्रमांक ७६/२०१३ मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) खिंडसी जलाशयाचे पाणी जलविमान सेवेमुळे दूषित झाल्याबाबत

**(४०) ९५१४ (०७-०४-२०१५). श्री. डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) खिंडसी जलाशयाचे पाणी रामटेक शहरासह अनेक गावांना पिण्यासाठी वापरण्यात येत असल्याने जलविमान सेवेमुळे जलाशयातील पाणी दूषित होऊन या गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. रामटेक शहराचा पाणीपुरवठा खिंडसी जलाशयातुन होती. नगरपरिषद रामटेक यांच्याकडून नियमित पिण्याच्या पाण्याच्या नमुन्याची प्रादेशिक प्रयोगशाळा येथून तपासणी करण्यात येते. सद्यस्थितीत रामटेक नगरपरिषद येथे पाण्याचे दुषित नमुने आढळून आले नसल्याचे मुख्याधिकारी नगरपरिषद रामटेक यांनी नमूद केले आहे.

---

**सोलापूर जिल्हयातील शासनमान्य ग्रंथालयांच्या अनुदानाबाबत**

**(४१) ९५६१ (०८-०४-२०१५). श्री. नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील शासनमान्य ग्रंथालयास सन २०१४-१५ या वर्षासाठी अनुदानाच्या पहिल्या हप्त्याचे पैसे अद्यापपर्यंत मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रंथालयास त्वरीत अनुदानाचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०६-२०१५) :** (१) नाही.

सन २०१४-१५ मध्ये सहाय्यक अनुदानासाठी उपलब्ध निधी रु.८३१९० हजार मधून सोलापूर जिल्हयातील कार्यरत असलेल्या शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा पहिला हप्ता पूर्णपणे प्रदान करण्यात आलेला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवना-टाकळी मध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पुनर्वसन व सिंचन वाढीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात**

**(४२) ९५७५ (०७-०४-२०१५). श्री. हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवना टाकळी मध्यम प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पुनर्वसन व सिंचन वाढीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात मा.जलसंपदा मंत्र्यांना दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०६-२०१५) :**(१) होय.

(२) या प्रकल्पास सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु. १०.६० कोटीची तरतूद केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लाहेरी (ता. भामरागड, जि. गडचिरोली) येथे सहा विद्यार्थी बेपत्ता झाल्याबाबत**

**(४३) ९६१९ (०६-०४-२०१५). श्री. विजय औटी (पारनेर), श्री. हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री. अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री. अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. संतोष टारफे (कळमनुरी), श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाहेरी (ता. भामरागड, जि. गडचिरोली) येथील तीन विद्यार्थीनीसह सहा विद्यार्थी बेपत्ता झाल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१५) :** (१) शासकीय आश्रम शाळा लाहेरी येथील तीन विद्यार्थिनी दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी व तीन विद्यार्थी दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी बेपत्ता झाल्याने निष्पन्न झाले आहे,

(२) सदर विद्यार्थी बेपत्त झाल्याने उप पोस्टे लाहेरी येथे गु.र.क्र.०१/२०१५, भा.दं.वि. कलम ३६४, ३६५, ३६६ (अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून हरविलेल्या मुलींना शोधण्यासाठी पोलीस पथक स्थापन करण्यात आले असून सदर पोलीस पथकामार्फत छत्तीसगड सिमेवर बिनागुंडा, पेरमीभट्टी, फोदेवाडा, धामनमर्का, तुरेमर्का, कुव्वाकोडी इ. अबुझमाड परिसरातील गावात कसुन शोध करण्यात येत आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपर कामगार आयुक्त पुणे विभाग, पुणे कार्यालयाबाबत**

**(४४) ९६९१ (०७-०४-२०१५). श्री. विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे कार्यालयाचे कामकाज संगणकीकृत करणे, अभिलेख कक्ष व अभिलेख कक्ष ठेवण्यासाठी रेकॉर्ड कीपर अशा विविध मागण्या अपर कामगार आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच सदर कार्यालयाची इमारत जीर्ण झाली असून वापरण्यास अयोग्य असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच सदरहू कार्यालयात सर्व संवर्गातील ३३१ पदांपैकी १५१ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०३-०६-२०१५) :** (१) होय. अभिलेख कक्ष व कक्षासाठी रेकॉर्ड किपर मिळण्याबाबतचा प्रस्ताव कामगार आयुक्त, पुणे यांचेकडे पाठविला आहे,
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) हे अंशत: खरे आहे. बहुतांश रिक्त पदे ही गट क व ड ची आहेत. गट- अ व ब मधील संवर्गासाठी मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. गट-क व ड ची प्रादेशिक स्तरीय पदे भरण्याबाबत कार्यवाही अपर कामगार आयुक्त, पुणे त्यांचे स्तरावर सुरु आहे.

---

**मौजे राख व मौजे वाल्हे (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील मंजूर उपसा सिंचन योजनेचा समावेश कृष्णाखोरे विकास महामंडळातर्गत करण्याबाबत**

**(४५) ९६९९ (०७-०४-२०१५). श्री. विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे राख व मौजे वाल्हे, (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील नियोजित शरद सहकारी पाणी पुरवठा संस्थेस नीरा नदीतून उपसा सिंचनाने पाणी उचलण्याची परवानगी दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खाजगी योजनेचा खर्च दुष्काळी भाग असलेल्या या गावांना परवडणारा नसल्याने मंजूर उपसा सिंचन योजनेचा समावेश कृष्णा खोरे विकास महामंडळातर्गत करण्याची मागणी सदर संस्थेने सन १९९९ दरम्यान करुन ही अद्याप त्यास मंजूरी देण्यात आली नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मंजूर उपसा सिंचन योजनेचा समावेश कृष्णा खोरे विकास महामंडळातर्गत करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोसीखुर्द सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या, भंडारा व नागपूर जिल्हयातील लाभार्थीस संगणक प्रशिक्षण देण्याच्या योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४६) ९७०० (०७-०४-२०१५). श्री. विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसीखुर्द सिंचन प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या, भंडारा व नागपूर जिल्हयातील ३६८८ लाभार्थीना संगणक प्रशिक्षण देण्याच्या योजनेस शासनाने फेब्रुवारी, २०१० मध्ये मंजुरी दिलेल्या योजने अंतर्गत कोणत्याही लाभार्थीस प्रशिक्षण न देताच प्रशिक्षण संस्थेने शासनाचे १.६९ कोटी स्वत:च ठेऊन घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून वसूल करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-०६-२०१५) :** (१) नाही. रोजगारीभीमुख तांत्रिक प्रशिक्षणाचे अनुदान कोठल्याही प्रशिक्षण संस्थेस देण्यात आलेले नसून फक्त लाभार्थ्यास देण्यात आले आहे. लाभार्थ्यांकडून तांत्रिक प्रशिक्षण घेत असल्याचे शपथपत्र, प्रशिक्षण संस्थेचा दाखला, लाभार्थ्यांचे शाळा / विद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र इत्यादी दस्ताऐवज सादर झाल्यानंतर त्यांना अनुदानाचे भुगतान करण्यात आले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र नियंत्रण मंडळाची स्थापना करण्याबाबत**

**(४७) ९७३५ (०९-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय स्थापन करण्यात आले असून येथील अधिकाऱ्यांवर आश्रमशाळा, वसतीगृह व पाचशेच्या वर योजनांची जबाबदारी देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्प कार्यालयांवर आदिवासी विद्यार्थी संघटनेतर्फे मोर्चा काढून आदिवासी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र नियंत्रण मंडळाची स्थापना करण्याची मागणी केली शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.

आदिवासी उपयोजने अंतर्गत राज्यस्तर व जिल्हास्तर मिळून सर्वसाधारण ३६० योजना आहेत. सदर योजनांपैकी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालया मार्फत सर्वसाधारण ११३ योजना, तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या थेट निधीतून काही ठराविक योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जाते. उर्वरित सर्व योजनांची अंमलबजावणी संबधित विभागामार्फत करण्यात येते (आदिवासी विकास विभागातील एकूण २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांची यादी सोबत जोडली आहे.)

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

| अ.क्र. | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय |
|---|---|
| १ | नाशिक |
| २ | कळवण |
| ३ | राजूर |
| ४ | यावल |
| ५ | तळोदा |
| ६ | नंदूरबार |
| ७ | धुळे |
| ८ | मुंबई |
| ९ | पेण |
| १० | शहापूर |
| ११ | सोलापूर |
| १२ | जव्हार |
| १३ | डहाणू |
| १४ | घोडेगाव |
| १५ | औरंगाबाद |
| १६ | अकोला |
| १७ | किनवट |
| १८ | पांढरकवडा |
| १९ | धारणी |
| २० | कळमनुरी |
| २१ | पुसद |
| २२ | नागपूर |
| २३ | चंद्रपूर |
| २४ | चिमूर |
| २५ | देवरी |
| २६ | भंडारा |
| २७ | अहेरी |
| २८ | भामरागड |
| २९ | गडचिरोली |

## भंडारा-गोंदिया राज्य महामार्गाची झालेली दुरावस्था

**(४८) ९७४६ (०९-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा- गोंदिया राष्ट्रीय महामार्गासह सर्वच रस्त्यांची स्थिती अत्यंत खराब असून गोंदिया जिल्हयात तिरोडा येथे सुरु असलेल्या अदानी महाऔष्णिक प्रकल्पामध्ये मर्यादेपेक्षा जास्त वजनाने सामान घेऊन ये-जा करणाऱ्या ओव्हरलोड ट्रकमुळे भंडारा- गोंदिया राज्य महामार्गाची स्थिती खराब झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शहरात ओव्हरलोड वाहनांवर बंदी आणून राज्य महामार्गावरील रस्ते कायमस्वरुपी दुरुस्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच वाहनांवर मर्यादीत भाराची वाहतूक करण्यासाठी अदानी प्रकल्पाला सुचना देण्यात येणार आहे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०६-२०१५) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी व निवृत्ती वेतनाचा लाभ मिळण्यासह ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ करण्याची केलेली मागणी

**(४९) ९७७३ (०८-०४-२०१५). श्री. राजेश काशीवार (साकोली), श्री. संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी व निवृत्ती वेतनाचा लाभ मिळण्यासह ग्रंथालय अनुदानात दुप्पटीने वाढ करणे आदी मागण्यांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटनेतर्फे शासनाकडे पाठपुरावा करण्यात आलेला असतानाही राज्यातील ५ हजार ७८८ सार्वजनिक ग्रंथालयांना अद्यापपर्यंत वाढीव अनुदान देण्यात आले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने निर्णय घेण्याचे आदेश शासनाला देवूनही अद्यापपर्यंत आदेशाचे पालन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त कर्मचारी संघटनेच्या सदरील मागण्या तातडीने मान्य करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०६-२०१५) :** (१) नाही.

महसूल विभागाच्या पडताळणीमध्ये त्रुटी आढळून आलेल्या ग्रंथालयांची तपासणी करून तपासणीमध्ये कार्यरत आढळून आलेल्या ग्रंथालयांना वाढीव अनुदान लागू करण्यात आले असून त्यांना वाढीव तदर्थ अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(२) नाही.

मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार शासन निर्णय दिनांक ५.१२.२०१४ निर्गमित करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईच्या महानगरपलिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या पोषण आहारासाठी सेंट्रल किचन करण्यास राज्य शासनाने परवानगी दिल्याबाबत

**(५०) ९७७९ (०९-०४-२०१५). श्री. संजय पोतनीस (कलिना), श्री. अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री. तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री. सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांना दिल्या जाणा-या पोषण आहारासाठी सेंट्रल किचन करण्यास शासनाने परवानगी दिली आहे परंतु आहार बनविण्यासाठी निविदा मागविण्याचे अधिकार शासनाकडे असल्याने या योजनेत महिला बचत गटाचा सहभाग करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास घेतल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाचे उपरोक्त अधिकार महानगरपालिकेला देण्याची मागणी महानगरपालिकेने शासनाकडे माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१५) :** (१) ते (४) शालेय पोषण आहर योजनेंतर्गत नागरी भागामधील शाळांमध्ये तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली राबविण्याचा निर्णय शासनाने दि.१८ जून, २००९ रोजी घेतला आहे. सदर शासन निर्णयानुसार मुंबई महापालिका क्षेत्र वगळून इतर नागरी भागासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज मागवून संस्थांची निवड करण्यात आली आहे. तथापि मा.उच्च न्यायालयामध्ये याविरोधात याचिका दाखल झालेल्या होत्या. सदर याचिकांवर शासनाच्या बाजूने निर्णय झालेला होता. तथापि मा.उच्च न्यायालयाने सदर योजनेमधून शिक्षकांचा सहभाग वगळण्याचे आदेश दिलेले होते.

शालेय पोषण आहर योजनेमध्ये शिक्षकांचा सहभाग आवश्यक आहे. यामुळे शासनाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली होती. सदर प्रलंबित याचिकेमुळे मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणाली लागू करण्याबाबत पुढील कार्यवाही प्रलंबित होती. सदर याचिकेबाबत दि.१७/४/२०१५ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या बाजूने निर्णय दिला आहे. यानुसार मुंबई महापालिका क्षेत्रात केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणाली सुरु करण्याबाबत करावयाच्या पुढील कार्यवाहीबाबत शासन स्तरावर विचारविनिमय सुरु आहे.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.